डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ व्या जयंती वर्षानिमित्त पातुर्डा, ता.संग्रामपूर, जि.बुलढाणा येथील मातीचा बुध्दविहार व परिसराचे नुतनीकरणासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक: सान्यावि-२०१७/ प्र.क्र.४०५/ बांधकामे
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ७ फेब्रुवारी, २०१८.

वाचा :- १) शासन निर्णय क्र. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.सान्यावि-२०१५/ प्र.क्र.१६३/बांधकामे, दि.९/१०/२०१५
२) शासन निर्णय क्र. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग बैठक-२०१६/ प्र.क्र.४७५/ बांधकामे, दि.२४/३/२०१७
३) आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांचे पत्र क्र.सकआ/मावक/पातुर्डा/ऐति.स्थळ/ २०१७-१८/का.१२/१५७२, दि.३/११/२०१७.

प्रस्तावना :-

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त अनुसूचित जाती व नवबौध्द घटकासाठी ऐतिहासिक व सांस्कृतिकदृष्टया महत्व असलेल्या स्थळांचा विकास करणे या अंतर्गत संदर्भ क्र.१ अन्वये मा.मंत्री (सा.न्या.वि.स.) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीच्या दि.१/८/२०१६ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तासोबतच्या परिशिष्ट “अ” मध्ये अनुसूचित जाती नवबौध्द घटकासाठी ऐतिहासिक व सांस्कृतीकदृष्टया महत्व असलेल्या एकूण २८ ठिकाणे/स्थळांची यादी अंतिम करण्यात आली असून संदर्भ क्र.२ येथिल दि.२४/३/२०१७ च्या शासननिर्णयान्वये सदर कामांना तत्वत: मंजूरी प्रदान करण्यात आली आहे. त्यामध्ये पातुर्डा, ता.संग्रामपूर, जि.बुलढाणा येथील मातीचा बुध्दविहार व परिसराचे नुतनीकरणासाठी रु.१ कोटी निधी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिनस्त ठेवण्यात आलेला आहे.

आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांच्यामार्फत पातुर्डा, ता.संग्रामपूर, जि.बुलढाणा येथील मातीचा बुध्दविहार व परिसराचे नुतनीकरणासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सदर कामाच्या परिगणित करण्यात आलेल्या रु.९९,९२,०००/-(रुपये नव्व्याण्णव लक्ष ब्याण्णव हजार फक्त) इतक्या रक्कमेच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त पातुर्डा, ता.संग्रामपूर, जि.बुलढाणा येथील मातीचा बुध्दविहार व परिसराचे नुतनीकरणासाठी रु.९९,९२,०००/-(रुपये नव्व्याण्णव लक्ष ब्याण्णव हजार फक्त) इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास खालील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे:-

अटी व शर्ती :-

१) काम सुरु करण्यापूर्वी नमुना नकाशा, मांडणी नकाशा तसेच विस्तृत नकाशास वास्तुविशारदांकडून मंजूरी घेऊनच सुरु करावे.

२) ढोबळ स्वरुपात धरण्यात आलेल्या तरतुदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक करुनच काम हाती घ्यावे.

३) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र.इएनव्ही-२०१३/प्र.क्र. १७७/तां.क.१, दि.१० जानेवारी, २०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

४) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णयक्र.बीडीजी-२०१७/प्र.क्र.६०/इमारती-२, दि.७/७/२०१७ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

५) प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यापूर्वी अंदाजपत्रकावर अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, बुलढाणा तसेच उपभोक्ता विभागाच्यावतीने सक्षम अधिकाऱ्याचे साक्षांकन आवश्यक आहे.

६) नियोजित जागा उपभोक्ता विभागाच्या ताब्यात असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुन सदर कामाच्या निविदा सूचना प्रसिध्द करण्यात याव्यात.

२. प्रस्तुत कामावरील खर्च हा संदर्भ क्र.२ येथे नमूद दि.२४/३/१७ च्या शासननिर्णयातील परिच्छेद २ नुसार कार्यकारी अभियंता तथा संमन्वयक, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यांचे अधिनस्त ठेवण्यात आलेल्या निधीतून करावा.

३. या करीता आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून, त्यांनी या कामासाठीचा निधी, वित्त विभागाने विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार त्या त्या टप्प्यावर सदरहू कामाकरीता वितरीत करावा.

४. प्रस्तुतचा शासन निर्णय, दि.९/१०/२०१५ च्या शासन निर्णयान्वये गठित समितीस प्राप्त अधिकार तसेच वित्तीय अधिकार, नियम पुस्तिका, १९७८, भाग पहिला, उपविभाग-पाच, अनु.क्र.१ महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परि.क्र.१३४ खाली प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०२०७१७१९३०६०२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Anil Kondaji Ahire

Digitally signed by Anil Kondaji Ahire
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9004dcdaa635070d60922aaa5dec8888d343a47356798e6c9cf27e4353d60e51, cn=Anil Kondaji Ahire
Date: 2018.02.07 17:24:03 +05'30'

(अ.कों.आहिरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई

२. मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे.
४. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे/अमरावती
५. कार्यकारी अभियंता तथा समन्वयक, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे
६. कार्यकारी अभियंता, खामगाव
७. उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, जळगाव, जामोद.
८. प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, अमरावती.
९. सहायक आयुक्त, समाजकल्याण, बुलढाणा.
१०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परिक्षा), महाराष्ट्र१/२, मुंबई/ नागपूर.
११. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे/ बुलढाणा.
१२. सरपंच/ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत, पातुर्डा , ता.संग्रामपूर, जि.बुलढाणा.
१३. मा.मंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
१४. मा.राज्यमंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
१५. निवडनस्ती / बांधकामे.